# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** आरणी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0560 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/07/2025 01:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 16/07/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/07/2025
**Time From (वेळेपासून):** 17:06 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/07/2025 **Time (वेळ):** 00:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/07/2025 00:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जि प बांध उपविभाग कार्यालय ,उपअंभियंता कक्ष , आर्णी ,आर्णी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विनोद भिमराव चहांदे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कु-हा तळणी,आर्णी ,घाटंजी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कु-हा तळणी,आर्णी ,घाटंजी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8830818948

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष भगवानराव क्षिरसागर | | | 1. जिप बांधकाम उपविभाग आर्णी , आर्णी ,आरणी,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुरडकर | | | 1. आर्णी ,आर्णी ,आरणी,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |
| 3 | सागर शंकरराव भारती | | | 1. आर्णी ,आर्णी ,आरणी,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांकः 16/07/2025
फिर्याद
माझे नांव:- श्री.विनोद भिमराव चहांदे वय 36, धंदा शेती, सरपंच ग्रा.प.कु-हा (तळणी),रा.कु-हा (तळणी),ता. आर्णी,जि.यवतमाळ मो.क्र.8830818948
मी वरिल प्रमाणे रा.कु-हा (तळणी),ता.आर्णी येथील रहीवासी असुन शेतीचा व्यवसाय करतो.तसेच सन 2021 पासुन ग्रामपंचायत कुऱ्हा (तळणी) येथे सरपंच या पदावर कार्यरत आहे.आमचे गावामध्ये शासनाच्या जिल्हा वार्षिक योजनेतुन जनसुविधेकरिता स्मशानभुमीचे शुशोभिकरणाचे काम करण्याकरिता सन 2024-25 मध्ये ग्रामपंचायत ठरावाअंतर्गत प्रशासकिय मंजुरी देण्यात आली होती.त्याकरिता 10 लाख रूपये प्रस्तावित करण्यात आले होते. सदरच्या कामास दि.03/04/2025 रोजी जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडुन तांत्रीक मंजुरी देण्यात आली होती. सदर कामाकरिता ग्रामपंचायतीला अधिकार असल्याने ग्रामपंचायतीने स्मशानभुमीच्या शुशोभिकरणाचे काम सुरु करून दिनांक 07/07/2025 रोजी पुर्ण केले आहे.त्यानंतर दि.08/07/2025 रोजी श्री.डुबुकवार साहेब,शाखा अभियंता,पंचायत समिती आर्णी यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट दिली व कामाची पाहणी करून कामाचे मोजमाप घेतले होते.त्यावेळी मी स्वतः हजर होतो,आम्ही मोजमाप करतेवेळी फोटो काढले होते.त्यानंतर शाखा अभियंता श्री. डुबुकवार साहेब यांनी झालेल्या कामाचे मोजमाप करून त्यांची एक प्रत बिलाकरिता ग्रामपंचायतीला दिली होती. त्यानंतर ग्रामसेवक यांनी सदर कामाचे देयक प्राप्त करण्याकरिता आवश्यक कागदपत्रे जोडुन शाखा अभियंता श्री डुबुकवार यांचेकडे दि. 08/07/2025 रोजी सादर केली होती. दि. 09/07/2025 रोजी श्री डुबुकवार यांनी सदरचे काम पुर्ण झाले बाबत सि.सि.प्रमाणपत्र तयार करून त्यावर त्यांची स्वाक्षरी केली व ते पुढील मंजुरी करिता उप अभियंता,बांधकाम उपविभाग,आर्णी,या कार्यालयाकडे सादर करण्याकरिता मी गावचा सरपंच असल्याने माझेकडे दिली होती.त्यानंतर मी दि.11/07/2025 रोजी उप अभियंता, जि.प.बांधकाम उप विभाग,आर्णी यांचे कार्यालयात गेलो व तेथे श्री क्षिरसागर साहेब,उप अभियंता, जि.प.बांधकाम विभाग यांची भेट घेतली व सदरचे बिलाची कागदपत्रे त्यांना दाखविली व त्यावर सही करण्याची त्यांना विनंती केली.त्यांनी संपुर्ण कागदपत्रे पाहीली व सदर कामाचे बिल 10 लाख रूपये असुन त्याच्या 2 टक्के प्रमाणे 20,000/- रू मला कॅषमध्ये दया,त्यानंतर मी तुमचे बिल आवक करून त्यावर सही करेल असे बोलले. श्री.क्षिरसागर साहेब हे लाचेची रक्कम कामाच्या बिलाच्या टक्केवारीत मागत आहेत,ते कामाच्या मंजुर रकमेच्या दोन टक्के लाच मागणी करीत आहेत.ते नेहमी टक्केवारीच्या भाषेत कोडवर्डच्या भाषेत लाचमागणी करतात,त्यांनी लाच मागणी करण्याकरीता श्री.सुरडकर यांना मध्यस्त ठेवलेले आहे,श्री.सुरडकर हे बांधकाम विभागातच नोकरीला होते,ते तिन ते चार महिन्यापुर्वी सेवानिवृत्त झालेले आहेत,मी त्यांना बिल आवक करण्याची विनंती केली परंतु त्यांनी बिलाच्या दोन टक्के रक्कम दिल्याशिवाय आवक करणार नाही असे सांगितले व मला सुरडकर साहेबांना भेटून घ्या असे सांगितले होते.त्यानंतर मी सुरडकर यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी मला सांगितले की,माझे साहेबांशी बोलणे झाले आहे,तुम्ही बिलाच्या रक्कमेच्या दोन टक्के प्रमाणे पैसे घेवून मंगळवारला या मी साहेबांची सही घेवून देतो.त्याशिवाय साहेब सही करणार नाहीत असे मला बोलले होते परंतु मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी सोमवार दिनांक 14/07/2025 रोजी अँटी करप्शन ब्युरो,यवतमाळ येथे जावुन श्री.मनोज ओरके पोलीस निरीक्षक यांची भेट घेवुन वरील माहिती दिली असता त्यांनी दोन शासकीय पंचाना बोलवुन माझी ओळख करून दिली व त्यांचे समक्ष मी संबधीत लाच मागणारे श्री.क्षिरसागर व श्री.सुरडकर यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी अशी माझी लेखी तक्रार दिली होती.त्यावरुन दिनांक 14/07/2025 रोजी ला.

प्र.वि.कार्यालय यवतमाळ येथे पडताळणी पुर्व पंचनामा कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर दिनांक 15/07/2025 रोजी मला श्री.सुरडकर यांनी बोलाविले असल्याने दिनांक 15/07/2025 रोजी माझ्या विनंतीनुसार पडताळणी कार्यवाही आयोजित करण्यात आली होती. पडताळणी करिता अँन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळ चे अधिकारी व पंच हे पंचासह आर्णी शहराबाहेर बायपास येथे मार्कड देवस्थान येथे आले होते त्यानंतर माझे तक्रारीप्रमाणे पडताळणी कार्यवाही करण्यात आली होती.

मी दिलेल्या तक्रारी वरुन पंचासह लाचमागणी पडताळणी करिता उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, आर्णी या कार्यालयात जावुन श्री.क्षिरसागर साहेब यांना भेटलो असता त्यांनी मला मी तुमच्या कामाला भेट देईल त्यानंतर सही करेल परंतु त्यापुर्वी तुम्ही सुरडकर साहेबांना भेटुन घ्या असे बोलले त्यानंतर मी श्री.सुरडकर साहेबांची भेट घेतली असता ते मला बोलले की,माझे साहेबांशी बोलणे झाले आहे,तुम्ही मंजुर कामाच्या रकमेच्या एक टक्केच दया,दोन कायले देता? दोन टक्के जास्त होते, मंग आणुन दया,असे बोलुन लाचेची मागणी केली.त्यानंतर मी त्यांना ठिक आहे असे सांगुन कार्यालयातुन परत पडताळणी पथकाकडे गेलो. तेथे घडलेली हकीकत सांगितली. सायंकाळी 17.09 वा.दरम्यान मला श्री.सुरडकर साहेब यांचे वापरते मोबईल क्रमांक 8999030838 यावरुन माझे वापरते मोबईल क्रमांक 8830818948 यावर फोन आला व ते मला म्हणाले की,उदया साहेब कामाला भेट देतील त्यानंतर तुम्ही पैसे घेवुन ऑफीसला या,मी तुम्हाला साहेबांकडुन सही करुन देतो.असे बोलल्याने माझ्या विनंतीवरुन आज दिनांक 16/07/2025 रोजी सापळा कार्यवाही आयोजित करावी अशी मी पोलीस निरीक्षक श्री.मनोज ओरके यांना विनंती केली होती.त्यानुसार आज रोजी पोलीस निरीक्षक श्री.मनोज ओरके हे त्यांचे पथकासह आर्णी येथे आले होते. दरम्यान आज दिनांक 16/07/2025 रोजी मला 11.27 वा.चे दरम्यान श्री.डुबुकवार शाखा अभियंता,पंचायत समिती आर्णी यांचा मोबाईल क्रमाक 8830570186 वरुन माझ्या मोबाईल क्रमांकावर फोन आला व त्यांच्या फोनवरुन श्री.क्षिरसागर साहेब हे माझेशी बोलले व मला म्हणाले की,मी तुमच्या कामाची पाहाणी केली आहे,तुम्ही सायंकाळी पाच वाजताच्या नंतर कार्यालयात येवुन मला भेटा असे बोलले होते. त्याअनुषंगाने मी सदरची हकीकत पोलीस निरीक्षक श्री.ओरके यांना सांगितली व त्यांना सायंकाळी 05.00 वा.चे नंतर श्री.क्षिरसागर यांचे कार्यालयात सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्याची विनंती केली होती.त्यानंतर मी बिलाच्या रकमेच्या एक टक्का प्रमाणे लाच रक्कम 10,000/- रुपये घेवुन श्री.क्षिरसागर साहेब यांना भेटण्याकरिता त्यांचे आर्णी येथील कार्यालयात पंचासह गेलो असता तेथे श्री.सुरडकर साहेब हे हजर नव्हते त्यामुळे मी श्री.क्षिरसागर साहेब यांची त्यांचे कार्यालयात भेट घेतली असता त्यांनी कामाची एम.बी.बुक व काम पुर्ण झाल्याच्या प्रमाणपत्रावर सही केली. व मला त्यांनी त्यांचा उजव्या हाताचा इशारा करुन पैशाबाबत विचारले त्यावरुन मी त्यांना बोललो की,मी पैसे आणले आहेत कुणाकडे देवु? त्यावेळी त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या त्यांच्या ड्रायव्हरकडे उजव्या हाताच्या इशा-याने पैसे देण्यास सांगितले. मी माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम 10,000/- रुपये काढुन त्यांचेकडे दिले. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन डावा हात वारंवार माझे डोक्यावरुन फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा केला, त्यानंतर पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ श्री.क्षिरसागर यांचे कार्यालयात येवुन श्री.क्षिरसागर साहेब व त्यांचा ड्रायव्हर यांना जागीच अटकाव करुन पंचासमक्ष लाचेची रक्कम श्री. क्षिरसागर साहेब यांचा ड्रायव्हर नामे सागर भारती याचे कडुन ताब्यात घेतली व त्यानंतर आम्ही सर्वजन शासकीय विश्रामगृह आर्णी येथे आलो व तेथे पोलीस निरीक्षक श्री.मनोज ओरके यांचेकडुन पुढील कार्यवाही केली आहे.यावरुन सरकारी लोकसेवक श्री.क्षिरसागर साहेब यांनी आमचे गावातील स्मशानभुमीच्या सुशोभिकरणाचे पुर्ण झालेल्या कामाच्या प्रमाणपत्रावर सही करण्याकरिता मंजुर कामाच्या दहा लाख रुपये रकमेच्या दोन टक्के प्रमाणे दिनांक 09/07/2025 रोजी व दिनांक 15/07/2025 रोजी सेवानिवृत्त झालेले श्री.सुरडकर साहेब यांच्या मार्फतीने लाच मागणी करुन तडजोडीअंती एक टक्का प्रमाणे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन आज दिनांक 16/07/2025 रोजी सायंकाळी 17.06 ते 17.55 वा.चे दरम्यान त्यांचे कार्यालयात श्री सुरडकर हे उपस्थीत नसल्याने श्री क्षिरसागर यांचा ड्रायव्हर श्री.सागर भारती यांचे मार्फतीने 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने माझी लोकसेवक श्री.संतोष भगवानराव क्षिरसागर,वय 53 वर्ष,पद उपअभियंता,नेमणुक जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आर्णी रा.मुळ पत्ता घर क्र.50 फरांदे नगर नांदेड व श्री.सुरडकर वय अंदाजे 58 वर्ष सेवानिवृत्त कर्मचारी रा.आर्णी ता.आर्णी जि. यवतमाळ तसेच श्री.सागर शंकरराव भारती, वय 27 वर्ष (खाजगी इसम)रा.चिंतामणी कॉलनी वार्ड क्र.05 पुलगाव जि .यवतमाळ यांचेविरुध्द पुढील कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी फिर्याद आहे.

माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टंकलिखित केली असुन मी वाचुन पाहिली ती घडलेल्या घटनेनुसार बरोबर व खरी आहे.

13. Action taken: **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NILESH DEVIDAS SURADKAR(SI (Sub-Inspector)) / 15101000402NDSM83017 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in Charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NILESH DEVIDA

**Rank**(पद): SI (Sub-Inspecto

**No.**(सं.): 15101000402NDSM8

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**